चित्पावन कौशिक गोत्री

# फाटक-रास्ते कुलवृत्तांत

द्वितीय आवृत्ती-२०१३



फाटक कुल समिती-पुणे

## चित्पावन कौशिक गोत्री

# फाटक-रास्ते कुलवृत्तांत



द्वितीय आवृत्ती - २०१३

प्रकाशक

**फाटक कुल समिती**

१०११ 'गोविंदधाम', सदाशिव पेठ,

फाटक गुरुजी मार्ग, पुणे ४११ ०३०

फोन : ०२०-२४४५९९०७

website : www.phatak.info

© प्रकाशक: **फाटक कुल समिती**

संपादक मंडळ

**श्री. विजयराव दत्तात्रय फाटक**

**श्री. शशिकांत नारायण फाटक**

**श्री. अच्युत गोविंद फाटक**

संपादन सहाय्यक

**कुल समिती सदस्य**

प्रथमावृत्ती - १९८२

द्वितीय आवृत्ती - २०१३

अक्षरजुळणी व मुद्रक

**श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.**

'दत्तकुटी', १४१६, सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

केवळ खाजगी वितरणासाठी

देणगीमूल्य

---

या पुस्तकातील कोणताही मजकूर, चित्र, छायाचित्रे, आकृत्या इत्यादी कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनःप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी प्रकाशकांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

# अनुक्रमणिका



| | |
|---|---|
| अर्पण पत्रिका हृदगत | एक |
| समितीची प्रस्तावना | तीन ते पाच |
| कानडी पुस्तकाची प्रस्तावना | सहा |
| कुलदैवतांची छायाचित्रे | सात ते दहा |
| कुलदैवत सूची | अकरा ते चौदा |
| ‘प्राजक्ता’मधील प्रकाशित व्यक्ति संस्था | पंधरा ते एकोणीस |
| देणगीदारांची यादी | एकवीस ते चोवीस |
| **घराणे १ ते ७१** | |
| (**टिप** : प्रस्तुत आवृत्तीमध्ये १९८२ च्या ग्रंथातील घराणे व वंशावळींचे पृष्ठ क्रमांक आहेत) | |
| १ वाईचे रास्ते | १ – ५ |
| २ रत्नागिरी | ६ – ७ |
| ४ धामणसे | ८ – १२ |
| ५ देवरुख | १३ |
| ७ जांभळी १ | १४ – २२ |
| ८ जांभळी २ | २३ – २५ |
| ९ रावडी | २६ – २७ |
| १० रावडी २ | २८ |
| ११ धोकवडे | २९ – ३५ |
| १२ खोपोली | ३६ – ४२ |
| १३ नरगुंद | ४३ – ४४ |
| १४ रत्नागिरी हावनूर | ४५ |
| १५ सातारा – नागपूर | ४६ |
| १६ लिमगांव | ४७ – ४९ |
| १७ सोमेश्वर वाडा चिंचखरी | ५० – ५२ |
| १८ सोमेश्वर हावनूर १ | ५३ – ५४ |
| १९ सोमेश्वर हावनूर २ | ५५ – ६१ |
| २० म्हैसाळ | ६२ – ६६ |
| २२ पुरळ देवगड | ६७ – ७० |
| २३ हातखंबा जमखंडी | ७१ |
| २४ कसबा संगमेश्वर | ७२ |
| २५ देवपाट १ | ७३ – ७९ |
| २६ देवपाट २ | ८० |
| २७ देवपाट ३ | ८१ – ८२ |
| २८ देवपाट ४ | ८३ |
| २९ देवपाट ५ | ८४ |

| | | |
|---|---|---|
| ३० | देवपाट ६ | ८५ |
| ३१ | सोनसळ | ८६ - ८७ |
| ३२ | कुंभारखाणी | ८८ - ९२ |
| ३३ | गोकाक | ९३ - ९४ |
| ३५ | वेंगुर्ले | ९५ - ११७ |
| ३६ | पडघवली | ११८ - १२२ |
| ३७ | बसणी | १२३ - १२७ |
| ३८ | माखजन | १२८ |
| ३९ | खेड रत्नागिरी १ | १२९ |
| ४० | खेड रत्नागिरी २ | १३० - १३५ |
| ४१ | चाफळ | १३६ - १३७ |
| ४३ | वानिवडे | १३८ - १४० |
| ४५ | नागाव | १४१ - १४३ |
| ४६ | अक्षीनागाव | १४४ |
| ४७ | अक्षीपळस्पे | १४५ - १४६ |
| ४८ | अडिवरे थळ | १४७ |
| ४९ | गोंदिया | १४८ |
| ५० | पाटण १ | १४९ - १५१ |
| ५१ | पाटण २ | १५२ |
| ५२ | वाई-सातारा | १५३ - १५४ |
| ५३ | नाशिक | १५५ - १५६ |
| ५६ | कागवाड | १५७ |
| ५७ | पुणे | १५८ |
| ६० | जुनागड बडोदे | १५९ - १६० |
| ६१ | रत्नागिरी नागपूर | १६१ - १६२ |
| ६५ | वेंगुर्ले अनगोळ | १६३ |
| ७० | जालगाव | १६४ - १६८ |
| | संकीर्ण (अज्ञात) | १६९ - १७३ |
| ७१ | दुर्ग (कर्नाटक) | १७४ - १८९ |
| | दुर्ग घराण्यातील प्रसिद्ध व्यक्तिंचा अल्पपरिचय | १९० - १९२ |
| | १९८२ आवृत्तीसह द्वितीय आवृत्ती व्यक्ति छायाचित्रे | १९३ - २३२ |


**परिशिष्टे**


| | | |
|---|---|---|
| १ | कुलफॉर्म संपादन सांख्यिकी | २३३ - २३४ |
| २ | फाटक फेसबुकसूची | २३५ - २३७ |
| ३ | संपर्कसूची (ई-मेल, फोन, मोबाईल, पत्ता) | २३८ - २६१ |
| ४ | अक्षरानुक्रमे व्यक्तिसूची | २६२ - २७२ |

**फाटक कुलवृत्तांत १९८२ चे संपादक कै. स. भा. रानडे यांच्या पायाभूत कार्यामुळे फाटक कुल समिती, यानंतरच्या काळात पुरवणी इ. कामात यशस्वी झाली. त्यांच्या स्मृतीस कुलातर्फे हे पुष्प समर्पण.**



**रानडे कृलवृत्तांतामधून**

सदाशिव भास्कर रानडे (१४) प्र. पृ. ३६६. रानडे कुल वृत्तांताच्या पहिल्या व या आवृत्तीचे संपादक. १९७४ मध्ये आगाशे कुलवृत्तांत संपादन करून प्रसिद्ध केला. १९७७ मध्ये मनोहर कुलवृत्तांत, १९७८ मध्ये रिसबूड कुलवृत्तांत व १९८२ मध्ये फाटक कुलवृत्तांत संपादन करून प्रसिद्ध केले. १९७८ पासून भावातीत ध्यान शिक्षक असून भावातीत ध्यान केंद्र चालवतात. यांनी व श्री. वि. वि. गोखले यांनी 'भावातीत ध्यान' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. ह्या पुस्तकाच्या दोन आवृत्ती झाल्या. वास्तव्य फ्रेंड्स पॅरॅडाईज, १२०५/२-३, शिरोळे रोड, संभाजी पार्कसमोर, पुणे ४११ ००४.

## फाटक कुल समितीचे हृद्‌गत

फा र वर्षांचा संकल्प सिद्ध झाला
ट ळुनि संकट कार्यात पुढे गेला ।।१।।
क धी उत्साही कधि निराशेत बुडला
कु सुम केसरमधु वंशसुरभि पसरला ।।२।।
ल ता-फल-पर्णी वृक्ष हा बहरला
वृ था स्तुति-निंदा जल्पना विसरला ।।३।।
त्तां प्रति कर्तव्य सेविता उरला
त नमनधनत्यागें बोध करुनि शिणला ।।४।।
देवधर्माप्रति व्हा नम्र स्वदेशि लीन
कुलरक्षणि हे बंधुगण विलीन ।।५।।

**अच्युत गोविंद**

# प्रस्तावना

२१ व्या शतकाच्या द्वितीय दशकामध्ये, काही वर्षांच्या दीर्घ निदिध्यासाने कौशिकगोत्रीय फाटक कुलाच्या व्यक्तींचे हे दुसरे वंशपुष्प प्रस्तुत करताना फाटक कुलसमितीस अत्यंत आनंद होत आहे.

१९८२ मधील कै. स. भा. रानडे संपादित फाटक व (रास्ते) कुलाचा, प्रथम ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर २००५ पर्यंत एका पिढीच्या कालांतरापासून आपल्याप्रमाणेच इतरही कुलांमध्ये द्वितीय खंडाची तयारी तत्संबंधित कुलकार्यकर्ते करीत होते. चित्पावनांचे जागतिक संमलेनाचाही संकल्प होऊन त्यातून अनेकांना प्रेरणा मिळाली. प्रथम संमलेनातून कुलांच्या विशाल, प्रत्यक्ष दर्शनातून हा प्रेरणास्त्रोत अनेक रूपांनी प्रकट होऊन, संक्षिप्त कुलबंधू मेळावे, बैठका, कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव, देवदेवतांच्या परिचयाची प्रकाशने, विवाहमंडळे इ. सामाजिक आशय वृद्धिंगत होण्यासही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

फाटक कुलबंधूंनीही आपण संघटन करून द्वितीय कुलग्रंथाची निर्मिति करण्याची उमेद धरून, त्यानुसार जून २००७ मध्ये श्री. शशिकांत नारायण व विजय दत्तात्रय हे दोघे संयुक्तपणे प्रयत्नास लागले. ५/६ महिन्यांमध्ये पुण्यातील व्यक्तींनी फाटक कुल समितीची औपचारिक स्थापना केली. मासिक बैठकीतून माहितीच्या फॉर्मची छपाई, वितरण, पत्तेसूची, ग्रंथासाठी शुल्क निश्चिती, बँकेत खाते, पत्रव्यवहार, विशेष व्यक्तींची माहिती/फोटो उपलब्ध करून घेणे, फॉर्म संकलनासाठी प्रवास, याद्वारे अनेकांचा संपर्क प्रस्थापित झाला.

समितीची उद्दिष्टाकडे वाटचाल - विविध बैठकींचे वृत्त :

१) समिती स्थापना - व्यक्तींची नावे निश्चित करणे.

२) समितीचे व कुलवृत्तांत प्रकाशनासाठी निधी ठरवणे व त्यासाठी बँक खाते उघडणे.

३) जुन्या कुलवृत्तांतावरून कुलबंधुंची नवीन पत्ते व इतर माहिती याचे विभागवार संकलन.

४) सुधारित पत्ते व नावे याची वेगवेगळ्या गावे व शहराप्रमाणे यादी करून छपाई केली. त्यानुसार प्रत्येक संमेलनासाठी त्याचा उपयोग केला.

५) गावोगावी ३० प्रतिनिधींना त्यांचे भागातील कुटुंबाची माहिती गोळा करण्याची जबाबदारी संपूर्ण तपशील देऊन, पूर्ण करण्याची विनंती केली.

६) एखाद्या साप्ताहिकातून (प्राजक्त) सर्वांशी संपर्क करणे - नवीन माहिती प्रसारित करणे.

मोरेश्वर सभागृहांत दि. २२/०७/२००९ - पुण्यातील कुलबंधूंचे संमलेन झाले. सुमारे १०० व्यक्ती उपस्थित होत्या. समिती कार्याची तयारीची माहिती दिली.

दिनांक २२/०८/२०१० समितीच्या नियुक्त प्रतिनिधींची बैठक (प्रचारार्थ) तपोधन सभागृह, पर्वती, पुणे येथे ४० जणांच्या उपस्थितीत झाली. दि. २४/१०/१० स्वतंत्र दुसरे कुलसंमेलन, वेबसाईट निर्मिती व कुलफॉर्मचा संकेत स्थळावर समावेश, मूळ आवृत्तीचे पुनर्मुद्रण, शुल्कबाकी असणाऱ्या कुलबंधूंना आवाहन, प्राजक्त साप्ताहिकांतून समितीचे विषय प्रकाशित करणे. डॉ. सुधीर मधुकर फाटक यांचे फाटक कुल वेबसाईटचे सादरीकरण. त्यासाठी त्यांचे वैयक्तिक योगदान.

दिनांक ६/१०/२०१० संमेलनपूर्व बैठक उपस्थिती २५ कार्यकर्ते. ठराव - ५०० प्रतींचे पुनर्मुद्रण, सर्व फॉर्मचे संगणकीकरण ५४४ फॉर्म = व्यक्ती ८७९. मिलेनिअम नॅशनल स्कूलमध्ये डॉ. सुधीर मधुकर यांच्याकडून संमेलन आयोजित करण्यात पूर्ण सहकार्य, सभा, भोजन, हॉल इ. विषयक संपूर्ण सहाय्य. गौरव व्यक्तींची नावे निश्चिति इ. विषय, सविस्तर चर्चा, व्यवस्थेचे सर्वानुमते निर्णय, वाहतूक, सभासद नोंदणी, ग्रंथवितरण, शुल्कसंकलन.

दिनांक ०६/०१/२०११ संमेलनोत्तर बैठकीत डॉ. सुधीर मधुकर यांचा सर्व फॉर्म व इतर कामे संगणकावर निःशुल्क २/३ महिन्यांत पूर्ण करण्याचा प्रस्ताव - जमा प्रतिनिधी शुल्कातून Millenium संस्थेस, भोजन व्यवस्थेचे २५,०००/- निधी देणे. ग्रु. कॅ. सुहास फाटक यांनी देणगी दिलेल्या संगणकाची क्षमता वाढविण्याच्या खर्चास मान्यता.

दिनांक १४/०२/२०११ डॉ. सुधीर यांना समिती कार्यकर्त्यांकडून दि. १९/०२/२०११ रोजी रु. २५,०००/- निधीप्रदान, चित्पावन संघाच्या मासिक बैठकीत इतर कुलप्रतिनिधींना ६० फाटक कुलग्रंथाचे संदभार्थ उपयोगासाठी वितरण.

दिनांक १४/०४/२०११ Millenium संस्थेत होत असलेल्या माहितीच्या संगणक कामामध्ये डॉ. सुधीर यांच्याशी संगणकज्ञान असणारे श्री. अनिल श्रीधर व भालचंद्र व विलास यांचा नियमित संपर्क.

दिनांक २४/०५/२०११ (१) मिलेनियम संस्थेतून बहुतांश फॉर्म (संगणकीकृत) समितीकडे आले. ते तपासणीचे काम श्री. विजयराव, अनिल श्रीधर व अच्युत गोविंद यांनी १ महिन्यात पूर्ण करण्याचे ठरले. (२) कुलशुल्क थकबाकी सभासदांना पत्रे पाठवून निधी वाढवणे.

दिनांक १९/०६/२०११ - दि. ११/६/२०११ या दिवशी डॉ. सुधीर व पत्नी वैदेही यांचे आकस्मिक, प्रवासात अपघाती निधन होऊन त्यांच्या शाळेवर, आप्तांवर व समितीवर दुःखाचा डोंगरच कोसळला. त्यांनी केलेल्या अमूल्य कुलसेवेचे, त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरणार्थ शोकसभा, स्वाध्याय महाविद्यालयांत झाली. अनेकांनी त्यांच्या गुणांचे स्मरण व समितीने कृतज्ञता व्यक्त करून, त्यांच्या संस्थेस व उर्वरित कुटुंबियांना शोकप्रस्ताव पाठवला. कुलग्रंथाची द्वितीय आवृत्ती प्रकाशित करण्याच्या कामास दिवंगत सुधीरपंत यांच्याकडे संगणकीय तपशील अडकल्याने पुढील निर्णय घेणे पुष्कळसे अवघड होत गेले.

दिनांक २५/०८/२०११ डॉ. सुधीर यांच्या निधनोत्तर, समितीपुढे असलेल्या समस्यांवर, उपायांवर विचारार्थ कार्यकर्ते एकत्र येऊन, यानंतर मिलेनियमकडे पुढील काम देणे योग्य नाही. डॉक्टरांच्या मुलांवर शाळेची जबाबदारी आहे. समितीने इतरत्र काम करून घ्यावे. श्री. अन्वित (पुत्र) व सौ. अर्पिता करकरे (मुलगी) यांच्याकडून योग्य तेवढेच सहकार्य घ्यावे, इ. विषयांवर चर्चा केली.

दिनांक २०/१०/११ च्या बैठकीमध्ये चित्पावन संघाचे द्वितीय संमेलन, औद्योगिक व कुलांचे मिलन असे संयुक्त संमेलन दि. २४/१२/११ स्व. चंद्रशेखर आगाशे कॉलेज परिसरात निश्चित झाले. त्याबरोबरच फाटकांचेही ३ रे संमेलनाच्या विचारार्थ सभासद आले होते. याविषयी चर्चा झाली.

१) किमान २०० फाटक यात उपस्थित राहणे आवश्यक.

२) चित्पावन संघाकडून संमेलनार्थ भोजन, कार्यालय व्यवस्था असते. त्याचा लाभ घेणे त्या त्या कुलांची जबाबदारी.

३) सर्वांना संपूर्ण माहिती योग्य निर्णयार्थ १ महिना आधी पाठवणे.

४) उद्योजकांची १५ नावे चित्पावन संघास दिली.

५) श्री. अन्वित फाटक यांच्याकडून फाटक Website कार्यक्षम करण्यासाठी प्रयत्न व्हावा इ. निर्णय केले.

दिनांक १०/१२/२०११ चित्पावन संघसंमेलन अल्पावधीत असताना, कुलसमितीकडे केवळ १०/१२ जणांनी पत्रास होकारार्थ उत्तर दिले. आपले संमेलन घ्यावे/रद्द करावे यावर समितीत साधक-बाधक चर्चा होऊन गोवर्धन कार्यालयांत संमेलन करण्याचा निर्णय झाला. १) अजित फाटक यांचे पुणे शहर छायाचित्र प्रदर्शन, २) कुलबंधूंच्या गटशः घराणेवार बैठकी, संरक्षण, विज्ञान, वाङमय क्षेत्रातील कर्तृत्वान व्यक्तींचे अनुभवकथन व त्यांचा गौरव, ३) Laptop वर समिती कामाची प्रगती, समितीकडे अजूनही फॉर्म न दिलेली घराणी व व्यक्ती व आवाहन, Website ची माहिती इ. विशेषांनी १०० व्यक्तींच्या उपस्थितीत संमेलन संपन्न झाले.

दिनांक ०३/०३/२०१२ मिलेनियमच्या संस्थेत सर्व फॉर्म संगणकावर नोंदले आहेत. परंतु त्याचे मुद्रण करून द्वितीय पुरवणी ग्रंथ सिद्धीस नेण्यासाठी ते काम इतर मुद्रकांकडे करून घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार २/३ प्रस्ताव मागवून, संस्थेकडे उपलब्ध निधी, पुरवणीचे स्वरूप, पृष्ठसंख्या, मुद्रकसंस्थेचा अनुभव यावर समितीने चर्चा करून, श्री जे प्रिंटर्स प्रा. लि. यांना हे मुद्रणाचे काम देण्याचे निश्चित केले. दि. ०४/०५/२०१२ (नृसिंहजयंती) पासून काम सुरू केले.

दिनांक २४/०५/२०१२ कुलग्रंथासाठी जाहिरातीद्वारे निधी यावा, फाटक उद्योजकांचा सर्वांना परिचय व्हावा या उद्देशाने १५ उद्योजकांना विनंती पत्रे पाठवली. कोणाचाही प्रतिसाद आला नाही.

एकमताने कामासाठी सेवाव्रती व तरुण व्यक्तींची कार्यकारी समिती आहे. सभासद : सर्व फाटक

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजय दत्तात्रय | सदस्य | २४४७२५५३ |
| २) | श्री. शशिकांत नारायण | सदस्य | ९४०३५०८३८७ |
| ३) | श्री. अनिल श्रीधर | सदस्य | २५३८२७८७ |
| ४) | श्री. अच्युत गोविंद | सदस्य | २४४५९९०७ |
| ५) | श्री. मिलिंद मधुकर | सदस्य | ९९२३०१५०५० |
| ६) | श्री. सुहास सदाशिव | सदस्य | ९३७१४५८०६३ |
| ७) | मोहन बाळकृष्ण | सदस्य | २४३२७४२४ |
| ८) | विलास रामचंद्र | सदस्य | ९३७१०५५२८४ |
| ९) | श्रीनिवास रामचंद्र | सदस्य | ९४२२७८५६३९ |
| १०) | भालचंद्र रघुनाथ | सदस्य | ९९२२९३४८२२ |
| ११) | रघुनाथ कृष्णाजी | सदस्य | ९५५२३६७५२३ |

अर्थव्यवहार – स्थापनेपासून उत्तरोत्तर शुल्कसंचय होत गेला. ३००/- रु. पासून निर्धारित १५००/- देणाऱ्या व्यक्ती आहेत. ३ कुलसंमलेनांमधून १) चित्पावन संघाचे २००७, २) समितीचे २०१० मिले शाळा, ३) चित्पावन संघाचे डिसेंबर २०११ गोवर्धन कार्यालयांतून वेळोवेळी कार्यालयाकडे आलेला निधी बँकेत जमा झाला.

स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे सिटी शाखेत, समितीची नोंदणी इ. नसल्याने, वैयक्तिक तिघांच्या नावावर खाते आहे. त्याचा तपशील खाते क्र. ३०४३९९५९८३९.

गेल्या ४ वर्षांत अनेक कुटुंबांना फोन इ. माध्यमांनी संपर्क साधल्यानंतरही, रु. ८०,०००/- शुल्क, समितीकडे येणे आहे. देणगीशुल्क सर्वांचे आल्यास, समितीस उपलब्ध निधीतून इतर उपक्रम करणे शक्य झाले असते.

मुंबई, पुणे महानगरांमध्ये फाटक कुटुंबांची लक्षणीय संख्या आहे. सुविधेच्या दृष्टिकोनातून त्या त्या ठिकाणी प्रकाशन व वितरण करावे असा निर्णय घेतला आहे.

ऋणनिर्देश – ग्रंथसिद्धीपर्यंत फॉर्मचे संगणकीकरणासाठी कै. सुधीर फाटक, विविध बैठकांमधून समिती कार्यकर्त्यांना उपलब्ध माहिती व प्रेरणा दिली ते महाराष्ट्र चित्पावन संघाचे पदाधिकारी, बैठका संमेलन जिथे झाली त्या संस्था, दुर्ग घराण्याची कानडी प्रस्तावना मराठीत, अल्पावधीत करणारे श्री. अनिल साठये, डोंबिवली., दुर्ग घराण्याची माहिती स्वकष्टाने एकत्रित करणारे व प्रस्तावना देणारे श्री. पद्मनाभ फाटक (कर्नाटक), समितीचा उत्साह वाढविणारे गावोगावचे कुलबंधू, या सर्वांनी प्रेम व आपुलकीने सर्व प्रकारचे सहाय्य मनापासून केले. कुलसमितीस स्वतंत्र जागा, पूर्वी नसल्याने श्री. विजयराव, शशिकांत यांच्या घरून, दुकानांतून व्यवहार होत असे. नंतर अच्युत गोविंद यांनी सदाशिव पेठेतील स्वतःच्या घरी, फोन, पाणी, फर्निचरसह कार्यालयास निःशुल्क जागा दिल्याने, आजपर्यंत तेथूनच सर्व कामे होत आली.

कायावाचामनाने समितीने हा प्रकल्प पूर्णत्वास नेतांना त्यात रहाणाऱ्या त्रुटी, माहिती अपूर्ण, प्रतिसादाचा अभाव आणि कार्यकर्त्यांची अत्यल्प संख्या यामुळे आहेत. सर्व बाजूंनी दक्ष राहूनही जे काही दोष राहतील त्याबद्दल कुलबंधू भगिनींनी आम्हास क्षमा करावी ही नम्र विनंती. पुरवणीग्रंथामध्ये अजूनही साधारणतः २२०० व्यक्तींची माहिती समितीकडे नसल्याचे क्लेशपूर्वक नोंदवावेसे वाटते. फाटक कुलाच्या सर्व आराध्य देवतांना हा ग्रंथ आम्ही अर्पण करतो आणि सर्वांवर त्यांची कृपादृष्टी असावी अशी शुभकामना करतो.

प्रत्यक्ष फॉर्म स्वरूपातच आलेली व्यक्तींची माहिती, या पुरवणीत समाविष्ट आहे.

समितीचे संकेत स्थळ (Website): www.phatak.info

**फाटक कुल समिती**
१०११ 'गोविंद धाम', सदाशिव पेठ, वेदाचार्य फाटक
गुरुजी मार्ग, पुणे – ४११ ०३०. फोन : २४४५९९०७

# कानडी पुस्तकाची प्रस्तावना – २०१०

**(भाषांतर कै. अनिल साठये, डोंबिवली, यांच्या सौहार्दाने)**

या पुस्तकाचे नावच मुळी 'दुर्गच्या फाटकांची वंशावळ' म्हणजे पुस्तकाचे विवरण, आणखी सांगायची आवश्यकता नाही. या पुस्तकाचे प्रयोजन काय म्हणाल तर, दुर्गच्या फाटकांचा कुलवृत्तांत आणि तत्संबंधी उपलब्ध माहितीचे संकलन.

आम्ही चित्पावन ब्राह्मण. महाराष्ट्रातून रत्नागिरी जिल्ह्यातून दक्षिण कन्नड जिल्ह्यात कधीकाळी स्थलांतरित झालो. आम्ही केव्हा आलो? कोणत्या गावातून आलो? कोणत्या मार्गाने आलो? स्थलांतराची कारणे काय? इत्यादी प्रश्नांना आज आमच्याकडे निश्चित उत्तरे नाहीत. बहुतेक स्थलांतरित कुटुंबे ही माहिती कोठेतरी लिहून ठेवण्यात तशी उदासीनच दिसतात. ती माहिती मिळाली असती तर अधिक बरे झाले असते. साधारणतः पाच पिढ्यांपासूनची दुर्गच्या फाटक घराण्यांची माहिती वंशावळ या पुस्तकात उपलब्ध होते. पुढच्या पिढ्यांच्या अभ्यासासाठी, अध्ययनासाठी याचा जरूर उपयोग होईल.

मी शाळा कॉलेजातून शिकत असताना माझे नाव अमुक अमुक पाठक असे लावीत असे. इंग्रजीत Pathak असे स्पेलिंग करत असे. माझे पूर्वज वेदपठण करणारे असावेत ही माझी समजूत असावी. माझी सर्व प्रमाणपत्रे, सर्टिफिकेट मधून माझे आडनाव 'पाठक' असेच नोंदविले आहे. मी B Com झाल्यावर सहा वर्षे राष्ट्रीय सयंसेवक संघाचा पूर्णवेळ प्रचारक होतो. तेव्हा महाराष्ट्रातून कर्नाटकात आलेले संघप्रचारक मला 'फाटलेले' म्हणून हाका मारीत. त्या विषयी मी त्यांना विचारले तर म्हणत चित्पावनात वेदपठण करणारे अनेक आहेत, होते, पण पाठक हे कुलनाम (आडनाव) नाही.

दुर्गच्या फाटक कुटुंबात, घराण्यात आजच्या पिढीत सहस्रचंद्रदर्शनाचा योग आलेला मी, माझ्या वडीलकीचा सन्मान म्हणून श्री. पदम्नाभ फाटक यांनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याची मला विनंती केली. श्री. पदम्नाभ फाटक गत दोन वर्षे या वंशावळींचा, कुलवृत्तांचा घरोघर शोध घेत होते. पत्रव्यवहार दूरध्वनीवरून संपर्क साधून उन्हातान्हात हिंडून माहिती जमा करीत होते. विचारविनिमय करत होते. सल्ले, सूचना स्वागतार्ह मानत होते. या कामातली त्यांची सेवावृत्ती खरोखरच स्तुत्य आहे. या कामी त्यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांचे, दुर्गमधे वृत्ती, व्यापार, उद्योग, नोकरी, शेती, बागायतीत आणि अन्य अनेक क्षेत्रांत व्यस्त असलेल्या दुर्गच्या अन्य फाटक कुलबंधूंचे हितरक्षण, दुर्ग ग्रामाचा श्री हरिहरेश्वर आपल्या कृपाकटाक्षाने करतोच आहे आणि सदैव करीतच राहील ही श्रद्धा आहेच, आणि तशी त्याचे चरणी प्रार्थनेसह.

**विदेह**
तेळ्ळारू रस्ता कार्कळ
दि. २१.०९.२०१०

**रघुनाथ फाटक**
दुर्ग

# संकलकाचे (संग्राहकाचे) मनोगत

माझ्या या कामाची मूळ प्रेरणा तेंगिनहित्लुचे कै. उमानाथ फाटक आणि गोकुलचे कै. सीताराम फाटक यांनी अनेक नोंदी उपलब्ध करून दिल्या, पूर्वजांविषयी माहिती दिली. गोकुलच्या पांडुरंग फाटकांनी अनेक वंशावळी वेळेत मला उपलब्ध करून दिल्या. आमच्या उपलब्ध माहितीनुसार दुर्ग फाटकांचे मूळ पुरुष विश्वनाथ भट फाटक साधारणतः १७७५ सालच्या दरम्यान येथे आले आणि मेट्टूकल्लूच्या घरात स्थिरावले. ते कोठून आले याबाबत कोठे नोंद आढळली नाही. परंतु त्यांच्यापासूनची ही दहावी पीढी.

प्रस्तुत पुस्तकात पहिल्या ते पाचव्या पिढीपर्यंत फक्त घराण्यातील पुरुषांची माहिती मात्र उपलब्ध आहे. स्त्रियांची माहिती नाही. पाचव्या पिढीनंतर मात्र आम्ही स्त्रीसंततीची माहिती देऊ शकलो. साधारणतः फाटकांची तेरा घराणी, पंचावन्न कुटुंबे आणि २०० जणांची माहिती येथे देता आली.

काही लेख, परिचय, काही वृत्तपत्रांतून चित्पावनांच्या 'भार्गववाणी' या मुखपत्रातून प्रकाशित झालेच आहेत. काही लेख, परिचय श्री. डी. श्रीकंठ भागवत यांनी लिहुन देऊन मोलाचे सहकार्य केले आहे. या पुस्तकाची प्रेरणा कै. उमानाथ फाटक आणि कै. सीताराम फाटक यांची, त्यांचे पुण्यस्मरण आहेच. श्री. पांडुरंग फाटक यांचे मी ऋणाईत आहे. आभारी आहे. निर्धारित वेळेत माहिती उपलब्ध करून देणारे श्री. डी. श्रीकंठ आणि प्रस्तावना लिहून या पुस्तकाचे महत्त्व पटवून देणारे श्री. रघुनाथ फाटक हे उभयंता वंदनीय आहेत.


**टीप** : नवे घराणे दुर्ग कर्नाटक क्रमांक ७१ हे पुढे पहावे

**हैपाजे पदम्नाभ गणपती फाटक**

## फाटक घराण्यांची कुलदैवते



श्री मुरलीधर गोपाळकृष्ण, जामसंडे, रत्नागिरी




श्री हरिहरेश्वर (दुर्ग), कर्नाटक



श्री देव कोळेश्वर, कोळथरे




श्री काळभैरवनाथ, देवपाट, संगमेश्वर



श्री व्याडेश्वर (गुहागर)

# फाटक घराण्यांची कुलदैवते



श्री गणपती, भटवाडी, वेंगुर्ले




भटवाडी, गणपती मंदिर



श्री रामेश्वर, वेंगुर्ले



श्री पंचनाथ महादेव मंदिर, जुनागड (गुजरात)



श्री भद्रेश्वर देवस्थान, वाई

# फाटक घराण्यांची कुलदैवते



श्री नवदुर्गा देवी, कनयाळे (वेंगुर्ले)



श्री सप्तश्रृंगी माता, वणी (नाशिक)



श्री तुळजाभवानी देवी, तुळजापूर





श्री योगेश्वरी देवी, अंबाजोगाई



श्री सातेरी देवी, वेंगुर्ले





श्री महाकाली देवी, अडीवरे





श्री करवीरनिवासिनी अंबाबाई

# ब्रह्मणस्पतिविश्व - ग्रंथमाला






दि. २४/१०/२०१० संमेलनास उपस्थित फाटक कुलसमुदाय




दि. २४/१०/२०१० चे मिलेनिअम नॅशनल स्कूलमधील संमेलनाचे मंचावरील फाटक कुलबंधू डावीकडून शशिकांत नारायण, विजय दत्तात्रय, सुधीर मधुकर, भरत बाळकृष्ण, डॉ. विक्रम दिनकर, श्रीपाद एकनाथ, प्रा. मधुसूदन भास्कर.

# कुलदैवत सूची

१९८२ आवृत्तीतील सर्व कुलदेवतांची माहिती या यादीत एकत्रित आहे. प्रसिद्ध कुलदैवते (श्री व्याडेश्वर, श्री अंबाजोगाई, श्री गणपति (पुळे)) इ. व्यतिरिक्त अनेक घराण्यांमध्ये वार्षिक कुलाचार - नैवेद्य उत्सव - परंपरागत आहेत. या विशिष्ट देवतांचे मंदिरांचे फोटो मिळण्यासाठी संबंधित ४० व्यक्तींशी संपर्क केला. १/२ च फोटो आले. भावी पिढ्यांना या परंपरांचे एकत्रित ज्ञान व्हावे या उद्देशाने ही सूची मार्गदर्शक होईल असे वाटते.

**फाटक कुलदेवता १९८२ कुलवृत्तांताप्रमाणे**

| घराण्याचे नाव | कुलदेवता स्वामी | मंदिर, विश्वस्त, कुलाचार, उत्सव सद्यस्थिती |
|---|---|---|
| रास्ते | १. अंबाजोगाई - श्रीशंकर<br>योगेश्वरी रत्नागिरी<br>२. भद्रेश्वर ३. खंडोबा-जेजुरी<br>४. श्रीभवानी - तुळजापूर | गौरी गणपती<br>देवदिवाळीत - ५२ देवांना<br>वडे घारगे नैवेद्य<br>दुर्गानवरात्र, मल्हारी षडरात्र<br>बोडण - गोंधळ |
| रत्नागिरी | जोगेश्वरी व्याडेश्वर-गुहागर, श्रावणांत - काळभैरव, जंबुकेश्वर सूर्य तृणबिंदूकेश्वर नवलाई पावणाई जोगेश्वरी नंदी, गणपति | नैवेद्य श्रावणातील |
| धामणसे (१) | रत्नेश्वर, चंडिका, जाखादेवी /<br>श्री महागणपति (पुळे) | मृण्मय गणेश वर्ज्य गौरी नवरात्र<br>नवरात्र बोडण |
| (२) | गणपति (पुळे)+योगेश्वरी, | |
| देवरूख (१) | महागणपति (पुळे) भवानी, सोमेश्वर<br>योगेश्वरी महाविष्णु, | देवदिवाळी - श्री सोळजाई<br>नैवेद्य, नवरात्र बोडण |
| रत्नागिरी-ठाणे | माहिती आलेली नाही. | नवरात्र, बोडण |
| जांभळी (१) | वैविध्य आहे - श्री काशी विश्वेश्वर - जांभळी, महालक्ष्मी (कोल्हापूर), गणपति (पुळे), खंडोबा (जेजुरी) महाकाली (आडिवरे), रेवतीनाथ, चंडिनाथ (कोकण) परशुराम व्याघ्रेश्वरी | नैवेद्य, व्याडेश्वर नवलाई (नैवेद्य) |
| (२) | महाकाली (आडिवरे), भैरी (रत्नागिरी)<br>सोनसाखळी (कसोम), | नवरात्र वर्ज्य, बोडण |
| रावडी (१) | माहिती आली नाही, | मात्र नवरात्र बोडण असते. |
| धोकवडे | योगेश्वरी, कोळेश्वरी (धोकवडे), महालक्ष्मी कोल्हापूर,<br>येथील गणपति, भागाबाई, मारुती | नवरात्र, बोडण, गणेशोत्सव धोकवडे<br>पूर्वी व्यवस्था फाटक करीत,<br>शोध घेणे |

| घराण्याचे नाव | कुलदेवता स्वामी | मंदिर, विश्वस्त, कुलाचार, उत्सव सद्यस्थिती |
|---|---|---|
| खोपोली | समाधि मंदिर - वामन पांडुरंग, महालक्ष्मी (कोल्हापूर) शंकर, गणपति, नृसिंह, | गणेशोत्सव गौरी नवरात्र बोडण |
| नरगुंद | योगेश्वरी, गौरीगणपति, | नवरात्र गोंधळ, बोडण परडी |
| लिमगाव ता. खेड पुणे | खंडोबा (लिमगाव) दसरा, | चंपाषष्ठी -नैवेद्य, गौरीगणपति |
| सोमेश्वर - चिंचरवरी | सोमेश्वर श्रीदत्त (चिंचरवरी), | गौरी गणपति नवरात्र, बोडण |
| सोमेश्वर-हावनूर (१) | सोमेश्वर जोगेश्वरी, | देवादिवाळी-नैवेद्य, |
| (२) | गणेशोत्सव, नवरात्र | |
| म्हैसाळ | महालक्ष्मी (कोल्हापूर), गौरी गणपति, जोगेश्वरी, त्र्यंबकेश्वर, जंबुकेश्वर, नवलई, गावराखी | नवरात्र, बोडण, गोंधळ, नैवेद्य |
| पावस | गौरीगणपति, | नवरात्र, बोडण |
| पुरळ | योगेश्वरी, सोमेश्वर (पावस), वीरभद्रेश्वर, पावणाई, खळनाथ गणपति गौरी गणपति, | नवरात्र बोडण वीरभद्रेश्वर कार्तिकउत्सव, त्रिपुरारी पौर्णिमा, माघी गणेशोत्सव |
| हातखंबा- जामखिंडी | योगेश्वरी श्रावणांत गौरी, गौरी-गणपति, | नवरात्र, बोडण गावांतील सर्व देवांना देवदिवाळित नैवेद्य |
| कसबा संगमेश्वर | कालभैरव (संगमेश्वर) जाखमाता जोगेश्वरी गौरी गणपति, | नवरात्र बोडण |
| संगमेश्वर वाडा देवपाट(१) | कालभैरव (संगमेश्वर) जाखमाता जोगेश्वरी | बोडण |
| देवपाट(२) | कालभैरव (संगमेश्वर) सप्तेश्वर (संगमेश्वर) गौरी गणपति नवरात्र | |
| देवपाट(३) | मेणेश्वर (वाई) | सर्व देवांना नैवेद्य शिवपंचायतन |
| देवपाट(४) | कालभैरव, जाखमाता, | गौरीगणपति, नवरात्र |
| देवपाट(५) | कालभैरव जानाईजुगाई, पिसाई, भैरोबा दत्त | नैवेद्य |
| देवपाट(६) | जोगेश्वरी जाखमाता - | नैवेद्य देवांना रसवडे, नवरात्र, बोडण |
| सोनसळ | कालभैरव जाखमाता जोगेश्वरी | गौ.ग. नवरात्र बोडण-गोंधळ |
| कुंभारखाणी | कालभैरव जोगेश्वरी, | नैवेद्य जाखमाता (संगमेश्वर) नवरात्र बोडण |

| घराण्याचे नाव | कुलदेवता स्वामी | मंदिर, विश्वस्त, कुलाचार, उत्सव सद्यस्थिती |
|---|---|---|
| गोकाक | काळभैरव, जोगेश्वरी, जाखमाता | गौ.ग. नव. बो. बोडण |
| देवपाट पाटण | कालभैरव (संगमेश्वर) | गौ.ग. नव. बो. |
| वेंगुर्ले | योगेश्वरी | गणपति मंदिर वेंगुर्ले |
| | गणपति (वेंगुर्ले) मातीचा गणपति वर्ज्य | ट्रस्ट |
| | सातेरी श्री गणपति -रामेश्वर वेताळ भवनाथ | आहे. १९५६ स्थापना |
| | जोगेश्वरी स्वयंभेश्वर देवदिवाळीस | गौ.ग. नव. बो. |
| पडघवली | गावदेव बहिरोबा | गणेश मंदिर उत्सव, मित्र |
| (गावाचे मूळ नाव | | समाजाकडून होतो. |
| ढोकशेत) | | (गौ.ग. नव. बो.) |
| | | नैवेद्य - गणपति (माघांत) |
| | | बहिरीनाथ |
| बसणी | योगेश्वरी (अंबाजोगाई), व्याडेश्वर, खळनाथ | नैवेद्य, गौ. ग. नव. बो. |
| माखजन | अंबाबाई (कोल्हापूर) गौरी - | नव., बो. |
| खेड रत्नागिरी | अंबाबाई (कोल्हापूर) | गौ.ग. नव. बो. ७ खडे |
| खेड रत्नागिरी (२) | भवानी (तुळजापूर) | नैवेद्य जाखाई - जोखाई |
| | नवलाई, पावलाई, जोगेश्वरी गणपति | गौ.ग. नव. बो. |
| चाफळ | योगेश्वरी (अंबाजोगाई) व्रत | ललितापंचमी |
| | | गौ.ग. नव. गोंधळ |
| कोळंबे (रत्नागिरी) | गंगेश्वर (कोळंबे) गौग. | नवरात्र नाही बो.मंदिरे - त्रिमुखी |
| | | नैवेद्य मुळपुरुषास गंगेश्वर, नागेश्वर |
| वानिवडे | महालक्ष्मी (कोल्हापूर), व्याडेश्वर | गौ.ग. नव. बो. गोंधळ |
| गणपतिपुळे | योगेश्वरी (अंबाजोगाई) | गौ.ग. नव. बो. गणपति बाळंभट |
| | नवरात्रात सुपारी ही देवी स्थापना | भिडे स्थापित |
| नागाव | नागेश्वर (नागाव) कुलधर्म कुलाचार | श्री. भीमेश्वर |
| | माहिती उपलब्ध नाही | श्री. नागेश्वर |
| अक्षी नागाव | काळकाई / कोळकाई | नैवेद्य, गौ.ग. नव. बो. |
| अक्षी पळस्पे | योगेश्वरी (अंबाजोगाई) | गौ.ग. नव. बो. पिठोरीव्रत |
| अडिवरे-थळ | महाकाली (आडिवरे) | |
| गोंदिया | योगेश्वरी (अंबाजोगाई) | गौ.ग. नव. बो. |

| घराण्याचे नाव | कुलदेवता स्वामी | मंदिर, विश्वस्त, कुलाचार, उत्सव सद्यस्थिती |
|---|---|---|
| पाटण (१) | अंबाबाई (कोल्हापूर) | गौ.ग. नव. बो. गोंधळ |
| पाटण (२) | अंबाबाई नैवेद्य - अंबाबाईस नवरात्र सातेरी, वेताळ, गणपति स्वयंभेश्वर | देवदिवाळी, नैवेद्य रामेश्वर, |
| वाई-सातारा | कुलदेवता माहिती उपलब्ध नाही. | गौ.ग.न.व.बो.गोंधळ, कोटेश्वर लिमगाव |
| नाशिक | सप्तशृंगी (वणी), खंडोबा (जेजुरी) गणपति (वेंगुर्ले) | गौ.ग.न.व.बो.गोंधळ |
| ताहराबाद (जि. नाशिक) मुल्हेरकर | योगेश्वरी (अं. जो) | गौ.ग.न.व.बो. |
| कागवाड (कर्नाटक) | कालभैरव | गौ.ग.न.व.बो. |
| पुणे (१) | कुलदेवता दैवत माहिती उपलब्ध नाही | |
| पुणे (२) | योगेश्वरी (अंबाजोगाई) | गणपति ५ दिवस, |
| आबू रोड | कुलदेवता, धर्मआचार माहिती नाही | |
| जुनागड | अंबाबाई (कोल्हापूर) | गौ.ग.न.व.बो. |
| रत्नागिरी (नागपूर) | योगेश्वरी अंबाजोगाई | |
| देवपाट (७ व ८) | | |
| देवपाट पाटण (२) | | |
| वेंगुर्ले अनगोळ | | |
| गणपतिपुळे-उज्जैन | गणपति (पुळे) | गणपति उत्सव, भाद्रपद व माघ, नव. बो |
| म्हाळुंगे | भवानी (तुळजापूर) | नैवेद्य देवदिवाळी, गौ.ग.न.व.बो. |
| हरणई-हर्णे | अंबाबाई (कोल्हापूर) खेमसाहेब हरणई, नाते (महाड) - सोमजाई, माणगाव-बहिरी बापूजी, वाकडाई, | नैवेद्य देवदिवाळीस - गौ.ग.न.व.बो. |
| ग्वालेर | योगेश्वरी (अंबाजोगाई) | गौ.ग.न.व.बो. |
| जालगाव (दापोली) | कोळेश्वर (कोळथरे), योगेश्वरी (अंबाजोगाई) महालक्ष्मी बोडण | मंदिरे -गणपति महालक्ष्मी |
| दुर्ग | श्रीहरिहरेश्वर मु. दुर्ग कर्नाटक | उत्सव दीपोत्सव रथोत्सव (माघ) पुष्परथोत्सव महाशिवरात्र वार्षिक उत्सव (वैशाख) रामनामसप्ताह |

# ‘प्राजक्त’ मधील प्रकाशित व्यक्ति, संस्था

स.न.वि.वि.

आपले परिपत्रक मिळाले. आपले आभार यापूर्वीच मानणे आवश्यक होते. परंतु कार्यबाहुल्यामुळे किंवा आळस यामुळे ते राहून गेले त्याबद्दल क्षमस्व!

आपण सर्व लोकांनी जे परिश्रम करून हे संमेलन यशस्वीरीत्या पार पाडलेत हे खरेच कौतुकास्पद आहे. त्यातील नियोजन, व्यवस्थापन हे खरेच वाखाणण्यासारखे होते. फाटक कुटुंबीयांतील व्यावसायिक, उच्चपदस्थ, शैक्षणिक तसेच ज्ञानी व्यक्तींचा सत्कार करून त्यांचे विचार आमचेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केलात त्यामुळे कार्यक्रमाची शोभा आणखीनच वाढली. आपण सर्व मंडळींनी यापुढेही हे कार्य चालू ठेवण्याची इच्छा प्रकट केली आहे. हा आणखीनच चांगला कार्यक्रम आहे. त्यासाठी लागणारे आर्थिक सहकार्य आमचे परीने आम्ही निश्चितपणे करू. या कार्यात आमच्या कुटुंबीयांची जी मदत लागेल ती आम्ही निश्चित करू. आपण ज्या सूचना मागविल्या आहेत त्या सूचना खालीलप्रमाणे.....

१) वर्षातून एकदा तरी फाटक कुटुंबीयांतील जास्तीत जास्त व्यक्तींनी एकत्र जमावे.

२) एप्रिल – मे महिन्यात शनिवार–रविवार जोडून एखादी छोटी ट्रिप व मुलांची शिबिरे आयोजित करावी.

३) एखादे कुटुंब गरीब असेल व त्यांची मुले शैक्षणिक, क्रीडा व इतर क्षेत्रात चमकत असतील तर त्यांना आर्थिक मदत करणे व त्यांचा सत्कार करून कौतुक करणे.

४) फाटक कुटुंबीयांची एखादी इमारत पुण्यात असावी की ज्यामुळे बाहेरून येणाऱ्या कुटुंबीयांची राहणेची व जेवणाची सोय माफक दरात होईल. तसेच फाटक कुटुंबीयांतील शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची माफक दरात राहण्याची व जेवणाची सोय होईल.

५) फाटक कुटुंबीयांच्या कल्याणासाठी एखाद्या आध्यात्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. उदा. यज्ञ, पारायण इत्यादी. म्हणजे वयोवृद्ध व्यक्तींना यामध्ये भाग घेता येईल.

६) सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसाला वैद्यकीय खर्च करावा लागतो. अशावेळी एखाद्या फाटक कुटुंबावर जर मोठ्या वैद्यकीय खर्चाची तरतूद करावी लागली तर त्यासाठी कर्ज काढावे लागते किंवा नातेवाइकाकडून कर्ज घ्यावे लागते. अशावेळी आपल्या फाटक कुल समितीतर्फे सर्वसाधारण खर्चाच्या पावभाग एवढी मदत देण्याची व्यवस्था करावी. त्यासाठी वर्षाला प्रत्येक फाटक कुटुंबीयांकडून रु. २०००/– एवढी रक्कम घेऊन एखादा मेडिकल फंड तयार करण्यात यावा. किंवा जनरल मेडिकल इन्शुरन्स सर्वांचा करण्यात यावा.

७) मुलांची जी शिबिरे क्र. ३ मध्ये वर्णन केलेली आहेत अशी शिबिरे आमच्या सांगली, कोल्हापूर भागात भरवली तर त्याचा खर्च आम्ही करू.

**सुहास माधव फाटक,** कोल्हापूर.

## एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : कै. पुरुषोत्तम भिकाजी फाटक

पुरुषोत्तम फाटक म्हणजे माझ्या वडिलांचे वडील. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यात मौजे निमगांव (खंडोबाचे) या ठिकाणी १९१० साली झाला. त्यांचे बालपण अत्यंत साधारण परिस्थितीत गेले. १९२० साली त्यांचे कुटुंब पुण्याला आले. नूतन मराठी विद्यालयातून १९३० साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी १९३४ साली दामले आणि कर्वे यांच्या सहकार्याने P.V. & Co. या नावाने किराणा भुसार मालाचे दुकान बाजीराव रोडवर सुरू केले. उत्कृष्ट माल, योग्य भाव, व्यापारातील सचोटी यामुळे ते दुकान भरभराटीला आले आणि आजही ते दुकान त्यांचे मधले चिरंजीव तितक्याच प्रामाणिकपणे चालवित आहेत. त्यांनी सुरू केलेल्या दुकानाला २००९ साली ७५ वर्षे पूर्ण झाली.

१९३२ च्या सुमारास त्यांचा महाराष्ट्रीय मंडळ संस्थेशी संबंध आला आणि तेव्हापासून त्यांनी संस्थेच्या कामकाजात लक्ष घालण्यास सुरुवात केली. कॅप्टन शिवरामपंत दामले हे संस्थेचे मूळ संस्थापक, माझ्या वडिलांचे जवळचे मित्र होते. त्यांनी माझ्या वडिलांवर खजिनदार या पदाची जबाबदारी टाकली आणि ती त्यांनी पन्नास वर्षे यशस्वीपणे पार पाडली. निःस्वार्थ बुद्धीने ते काम करत राहिले.

आज महाराष्ट्रीय मंडळ ही संस्था खूप मोठी झाली आहे. त्यांनी अनेक इतर शैक्षणिक उपक्रम सुरू केले आहेत. व्यायामशाळा, तालीम, पोहणे तलाव, व पोहण्याचे वर्ग, रायफल क्लब, एन.डी.ए. प्रशिक्षण वर्ग, इंग्रजी माध्यमाची शाळा, मराठी शाळा, बी.पी.एड. कॉलेज, एम.पी.एड. कॉलेज वगैरे या सर्वांच्या उभारणीमध्ये माझ्या वडिलांचे योगदान मोठे आहे.

ते स्वतः उत्तम कुस्तीगर, उत्तम जलतरणपटू होते. त्यांनी अनेक विद्यार्थीही तयार केले. ते एक हजार जोर व बैठका सहज काढीत असत. त्यांचा स्वभाव अत्यंत संयमी, अबोल व भिडस्त होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व अगदी साधे, सरळ होते. त्यांच्या या स्वभावामुळे ते प्रसिद्धीपासून दूर राहिले.

**डॉ. अविनाश फाटक**

## कै. पुरुषोत्तम वासुदेव फाटक

जन्म : २९ सप्टेंबर १८९८, मृत्यू : १ एप्रिल १९४०

शालेय शिक्षण राजापूर येथील हायस्कूलमध्ये झाले. त्यावेळचा टीचर्स ट्रेनिंग कोर्स पूर्ण केला होता. सुरुवातीला काही महिने रेव्हेन्यू खात्यात नोकरी केली. परंतु आपण इंग्रज सरकारची नोकरी करायची नाही असे ठरवून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

रत्नागिरीत गाडीतळावर (सध्याचा सावरकर चौक) नागो स्कूल नावाची आगाशे यांच्या मालकीची बंद पडत आलेली शाळा त्यांनी विकत घेतली आणि सुरुवातीला १९२२ साली मराठी शाळा सुरू केली. त्यावेळी त्यांच्या या शाळेचे नाव 'न्यू इंग्लिश स्कूल' असे होते. त्यांच्या हयातीत न्यू इंग्लिश स्कूलची पहिली बॅच मॅट्रिकच्या परीक्षेला बोटीने मुंबईला गेली. परंतु दुर्दैवाने या बॅचचा रिझल्ट पाहायला फाटक गुरुजी हयात नव्हते. ४ मुलांपासून सुरू झालेल्या या शाळेच्या पहिल्या बॅचचा निकाल १००% लागला.

१९४० साली पुरुषोत्तम वासुदेव फाटक यांच्या अकाली मृत्यूनंतर त्यांच्या सहकारी शिक्षकांनी 'दि न्यू एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली आणि शाळेला गुरुजींच्या स्मरणार्थ 'फाटक हायस्कूल' असे नाव दिले. आज संस्थेत एकूण तीन हजार विद्यार्थी शिकत आहेत. फाटक हायस्कूलसह तीन हायस्कूल्स, एक कनिष्ठ महाविद्यालय, एक मूकबधिर विद्यालय, एक प्राथमिक विद्यालय व एक बालवाडी असा संस्थेचा शैक्षणिक पसारा आहे.

सौ. शांता विश्वनाथ गाडगीळ<br>
सौ. दाक्षायणी सदानंद बोपर्डीकर<br>
सहशिक्षिका - फाटक हायस्कूल<br>
सेक्रेटरी- दि न्यू एज्युकेशन सोसायटी (रत्नागिरी)<br>
फाटक हायस्कूल (१९२२)<br>
अभ्यंकर प्राथमिक विद्यामंदिर (१९५८)<br>
अभ्यंकर बालविद्यामंदिर (१९७२)<br>
जागुष्टे हायस्कूल (१९८४)<br>
अभ्यंकर मूकबधिर विद्यालय (१९८१)<br>
नेने हायस्कूल (१९९७)

# कलाक्षेत्रातील, ऐतिहासिक काळात, फाटकांची भविष्यवेधी झेप

## कै. दादासाहेब फाटक

१८९४ सालात कै. दत्तात्रय आत्माराम ऊर्फ दादासाहेब फाटक यांनी आपल्या काही जोडीदार नाट्यप्रेमी सहाय्यकांच्या मदतीने, पुण्यातल्या त्यावेळेच्या विश्रामबाग वाड्यातल्या त्यांच्या हायस्कुलात, शिक्षकांच्या संपूर्ण परवानगीने, एक नाट्यसंघ स्थापन केला. त्या सर्व हौशी विद्यार्थ्यांनी आपल्या संघाला नाव दिले 'स्टुडंट्स सोशल क्लब', त्यावेळच्या पध्दतीप्रमाणे असे इंग्रजी नांव देण्यात कुणालाच काही गैर अगर चमत्कारिक वाटले नव्हते. त्यावेळच्या विश्रामबाग वाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत सरकारी हायस्कूल होते. हा वाडा शनीचे पाराच्या उत्तर बाजूस काही अंतरावर आहे.


१८९४ सालात स्टुडंट्स सोशल क्लब ही हौशी नाट्यकलावंतांची नाट्यसंस्था पुण्यातल्या हायस्कुलात स्थापन झाल्यानंतर संस्थेतल्या कार्यकर्त्यांनी पुण्यातच त्यावेळच्या बुधवार पेठेतील सरकारी हायस्कूल जवळच असलेल्या भुसारी यांच्या वाड्यातली एक खोली संस्थेसाठी भाड्याने घेतली. पुढल्या सालातच म्हणजे १८९५ सालच्या दसऱ्याच्या रात्री, विद्यार्थी सभासद कलावंतांनी 'हॅम्लेट' नाटकाचा पहिला अंक आणि त्यांच्या जोडीस संस्थेचेचे तरुण सभासद कै. गोपाळराव वाड यांनी स्वतः लिहिलेल्या 'कृष्ण-कृत्य-प्रदिप' या नावाच्या पौराणिक कथेवरील नाटकाचा एक अंक करून स्टुडंट्स सोशल क्लब या नाट्यसंस्थेच्या नाटकी संसाराला, त्या भाड्याने घेतलेल्या भुसारी वाड्यातल्या छोट्या जागेत मोठ्या उत्साहाने सुरुवात केली. त्या नाट्यप्रयोगासाठी पडदे, संस्थेच्या बालसभासदांनी घरून आणलेल्या जुन्या धोतर लुगड्यांचे केलेले होते आणि कृष्ण-कृत्य-प्रदिप व हॅम्लेट या नाट्य प्रयोगासाठी उजेड होता, उसनावर आणलेल्या रॉकेलच्या दिव्यांचा! नाट्यप्रयोगात सूत्रधार नटीचा प्रवेश होता. सूत्रधार होते कै. रामचंद्र नारायण पराड आणि नटी होत्या, संस्थेचे संस्थापक कै. दादासाहेब फाटक!!


त्या भुसारी वाड्यातल्या जागेत प्रत्यक्ष नाट्यप्रयोगांची वरीलप्रमाणे सुरुवात केल्यानंतर स्टुडंट्स सोशल क्लबने थोड्याच दिवसात स्थलांतर केले. हल्ली पुण्यातले सिटी पोस्ट ऑफिस बुधवार पेठेत ज्या ठिकाणी आहे, त्याच्या समोरच श्रीकृष्णा टॉकीजचा रस्ता आहे. त्या रस्त्याने पूर्व बाजूस जाणारा ढमढेरे बोळ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका जागेत श्री. थत्ते यांचे राम मंदिर होते. मंदिराच्या भोवती ओवऱ्या असून त्याच्यावर माडीही होती. संस्थेने श्री. थत्ते यांच्याकडून एक ऐसपैस माडी भाड्याने घेतली. ती सात खणी होती, आणि भाडे होते, दरमहा एकोणीस आणे. नाटकी मंडळींच्या तालमी वगैरेचा आराडाओरडा चालू राहणार म्हणून भाडे जरा मुद्दामच जास्त आकारण्यात आले होते.


त्यावेळी संस्थेची सभासद-वर्गणी होती, महिना नऊ पैसे (जुने आणे) आणि तिही सवडीनुसार देण्याची मुभा सभासदांना होती. संस्था या नव्या प्रशस्त जागेत आल्यानंतर संस्थेने स्वतःच्या उपयोगासाठी स्वतःच्या मालकीची दीड रुपया खर्चून एक सतरंजीवजा कोरी चटई विकत घेतली. बुधवार पेठेतल्या ढमढेरे बोळातल्या त्या राममंदिराच्या जागेत संस्थेने पुष्कळ नाट्यप्रयोग केले. 'झुंजारराव', 'फाल्गुनराव', 'दुर्गा' 'कांचनगडची मोहना' अशा नाटकांचे हौशी प्रयोग त्यावेळी त्या जागेत करून दाखवण्यात आले. प्रेक्षक मुद्दाम आमंत्रणे देऊन आग्रहाने बोलवले जात आणि विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने चालवलेल्या त्या नाट्यसंस्थेस प्रोत्साहन मिळावे म्हणून कै. तात्यासाहेब केळकर, कै. नाट्याचार्य खाडिलकर, कै. शिवराम महादेव परांजपे अशी थोर नाट्यप्रेमी रसिक मंडळी मुद्दाम उपस्थित राहून त्या शालेय नाट्य कलाकारांचे आपुलकीने कौतुक करीत.


१८९४ सालात स्थापन झालेल्या स्टडंट्स सोशल क्लब या महाराष्ट्रातल्या आद्य हौशी नाट्य संस्थेचे १९१३ सालात साधे सोशल क्लब या नावात रूपांतर झाले कारण संस्थेच्या सुरुवातीला खरोखरच विद्यार्थी (स्टुडंट्स) दशेत असलेले संस्थेचे कलावंत आता वयाने व कर्तबगारीने मोठे होत होते. त्यांच्या जोडीस समाजातले इतर तरुण लोकही सामील होत होते म्हणून मूळ नावातला पहिला स्टुडंट्स हा शब्द गाळून टाकणे योग्य व यथार्थ होते.


**भरत नाट्य संशोधन मंदिराचे संस्थापक**


दादासाहेब फाटक


दत्तोपंत परांजपे


अप्पा गोखले


दादा काळे


भाऊसाहेब दातार

# कै. रामचंद्र कृष्ण फाटक यांनी केलेले कार्य

रत्नागिरी जमिनीच्या १८७५ मधील करारपत्रामध्ये गोविंद महादेव फाटक यांना खोत म्हणलेले असून, श्रीपत बापूजी फाटक यांचा खोत-महाजन असा उल्लेख आहे.

वरील पैकी कै. रामचंद्र कृष्ण फाटक यांनी आर. के. फाटक शैक्षणिक ट्रस्ट १९४७ साली स्थापन केला असून कृष्णाजी बल्लाळ फाटक हे व त्यांचे मुलगे पुणे येथील घर नं. १५ अ नवा सदाशिव पेठ, पुणे येथे रहात होते.


आर. के. फाटक ट्रस्ट (शैक्षणिक) यांचे तर्फे गरीब चित्पावन बाह्मण विद्यार्थास दरमहा रु १५/- स्कॉलरशिप देण्यात येते व ती स्कॉलरशिप (१) रत्नागिरी येथील गोगटे कॉलेज, (२) पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज, सर परशुराम भाऊ कॉलेज, (३) सांगली येथील नवीन इंजिनिअरिंग कॉलेज (प्रत्येक संस्थेला रु. १५/- प्रमाणे), (४) पुणे अनाथ विद्यार्थी गृहाला दरसाल १६०/-, (५) पुणे येथील पीवायसी हिंदू जिमखाना कायम निधीसाठी दरसाल २००/-, (६) रत्नागिरी येथील कॉलेजला ३०००/- देण्यात आले असून रा. कृ. फाटकांचे चुलते कै. श्रीमंत बापूजी फाटक यांच्या नावे वरील रकमेच्या व्याजातून स्कॉलरशिप, (७) पुणे विद्यापीठाला वडील कै. कृष्णाजी बल्लाळ फाटक यांचे स्मरणार्थ देणगी.

# कै. गो. भि. फाटक गुरुजी यांनी निर्मिलेला वेदविस्तार

वेदस्वीकरणं पूर्वं, विचारोऽभ्यसनं जपः । तद्दानं चैव शिष्येभ्यो, वेदाभ्यासो हि पश्चधा ।।

**कै. ब्रह्मर्षि, घनपाठी, आचारनिष्ठ गोविंदभट्ट फाटक गुरुजी यांचे अल्पचरित्र**

विनामूल्य विद्याप्रदान, आजन्म व्रती, परोवजीवी वा मिंधा न झालेला, देहधारणार्थ प्रतिग्रह करणारा, उद्यासाठीही संग्रहापासून दूर रहाणारा, स्वपराक्रम, स्वकष्टाने दारिद्र्य सोसून अध्ययन अध्यापन, घरी अग्निहोत्र संभाळणारे व वेदांना जीवन अर्पण करणारे अशा आचार्यांची भारतात परंपरा होती, त्यातलेच एक फाटक गुरुजी.



जन्म शके १८०१ (इ. स. १८७९) वेंगुर्ले, वडील रामेश्वरभट्ट, आई दुर्गाबाई.

१८२१ वेदशास्त्रोत्तेजक सभेची प्रथम परीक्षा.

१८३१ वेदशास्त्रोत्तेजक सभेची दशग्रंथ परीक्षा - सर्वोत्तम.

१८३२ पुण्यात स्वतःच्या घरी वेदपाठशाळा स्थापना.

१८४२ कोल्हापूर येथे धनपारायण

१८५४ बडोदे येथे वेदाचार्य बहुमान प्राप्त.

१८५६ आहिताग्नि राजवाडे यांच्या अध्यक्षतेने सत्कार.

१८६१ षष्ट्यब्दपूर्ति गौरव-अध्यक्ष द. वा. पोतदार.

१८६७ देहावसान १५-८-४५

महाराष्ट्रात अनेक स्थानी संहिता स्वाहाकार, पारायणे, अनुष्ठाने यांचे नेतृत्व. अध्यापन काळात पुणे, मुंबई, त्र्यंबकेश्वर, इंदूर, कल्याण, नांदेड, हैद्राबाद, सावंतवाडी, पंढरपूर, गोवा, सांगली, आळंदी, मद्रास या विविध नगरांमधून ३०० विद्यार्थ्यांनी गुरुजींकडे अध्ययन केले.

शके १८६३ वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वास्तूचा गुरुजींच्या हस्ते कोनशिला समारंभ. १९५६ मध्ये सदाशिव पेठेत - फाटक गुरुजी मार्ग - नामकरण. १९५७ मध्ये काशीचे प्रकांडपंडित राजेश्वरशास्त्री द्रविड, पू. श्रीगुरुजी (मा.स.गोळवलकर) यांनी कै. वि. ह. घैसास प्रेरित फाटक गुरुजींच्या चरित्राचे प्रकाशन केले.

वेदाचार्य गोविंदभट्ट यांच्या कार्याची स्मृति सर्वत्र जपावी या हेतूने, पुणे विद्यापीठ, इंदूर वेदपाठशाळा, पर्वती देवस्थान, येथे तैलचित्रे (१९६६) व सारसबागेत पुतळा स्थापना.

इयं वेदिः परो अंतः पृथिव्या। असं यज्ञो भुवनस्य नाभिः। कृण्वंतो विश्वमार्यम्। सूर्य आत्मा जगतः तस्थुषश्च।

ब्रह्मर्षि फाटक गुरुजी विद्यार्थी मंडळ कार्यवाह पं. ग. गो. फाटक नोंदणी - ए - ६१०-१९५३ पुणे. मंडळाने सातत्याने पुण्यात प्रतिवर्षी संहितास्वाहाकार (३० वर्षे) चतुर्वेद मंत्र जागर, वेदग्रंथाची पारायणे, वैदिक धर्म, वाङ्मयावर अनेक व्याख्यानमाला, विद्वानांचे गौरवसमारंभ केले. सध्या या मंडळाकडून वेदांतर्गत ऋषिवंशानुसार 'ऋषिमंडळ यजन' अनेक गावी, नक्षत्रसत्रयाग ग्रहनक्षत्रांच्या युतिकाली, राष्ट्ररक्षणार्थ विशेष यज्ञ, विशिष्ट ग्रंथाचे प्रकाशन उदा. कुंडार्क इ. होत असते. या मंडळाचेही कार्यालय पुण्यात फाटक कुलसमितीच्या ठिकाणीच आहे.

**अ.गो.फाटक (३०/११/१२)**

## ब्रह्मणस्पतिविश्व : २१ ग्रंथांची विशेष गणेश ग्रंथमाला ऋध्दिसिद्धिसहस्त्रनामासहित : ।। श्री गणेशसहस्त्रनामाष्टक ।।

जन्मजन्मांतरीच्या पुण्यकर्माचा परिपाक उदित होतो तेव्हा, गणेशाप्रती, प्रिती, भक्ति उत्पन्न होते, व म्हणूनच वैभवशाली गणेश ग्रंथ आकारला आला. इति लेखक श्री. प्रदीप रामचंद्र रास्ते यांचे सार्थ मनोगत आहे.

प्रस्तुत ब्रह्मणस्पतिविश्व २१ ग्रंथांची विशेष गणेश ग्रंथमाला या अंतर्गत ऋध्दिसिध्दी सहस्त्रनामासहित ''श्री गणेश सहस्त्रनामाष्टक'' नामक ग्रंथ खरोखरच एकमेवाद्वितीय असा आहे. प्रस्तुत पुस्तक संशोधनावर आधारित, उपयुक्त विवेचन, उत्कृष्ट मार्गदर्शक, एक उत्तम ग्रंथसखा ठरला आहे. यात गणेशाची दुर्मिळ स्तोत्रे, आरत्या, गाणपत्यसंप्रदाय भारतभरातील गणेश स्थाने अशा वैविध्यपूर्ण गणेश वाङमयाचे मोठे उचित संकलन केलेले आढळते.

श्री गणेश हिंदू धर्माचे आद्यदैवत आहे. वैश्विक देवता, असामान्य रूप, ब्रम्हतेज क्षात्रतेज एकवटलेले, बुध्दिशक्तीची देवता, गणेशसहस्त्रनामातील प्रत्येक नाम हे गुणांचे वर्णन करणारे, घेतलेल्या अवताराचे दर्शन घडते. अवतार घेण्याचे स्थल, काल, शरीराचे वर्णन, विद्वत्ता, शौर्य, सैन्य, आयुधे, त्यांचा स्वभाव, नातीगोती व्यक्त होतात. श्री गणेशाच्या थोड्या नावांमध्ये सर्व इतिहास समाविष्ट आहे. संस्कृत श्लोकात, थोडक्यात मुद्देसूद यथार्थ वर्णन आढळते. बरीचशी नावे, पुराणातील कथेशी निगडित आहेत. काही नामे परमात्मवाचक, तर काही गणपतीची ऐतिहासिक कृत्यांची ओळख करून देतात. सृष्टी-स्थिती-लय त्याचीच रूपे आहेत. तो कालातीत विघ्ननाशक, अलौकिक आहे. श्री गणेश सहस्त्रनामाचे चिंतन, मनन, भक्ताला खऱ्या अर्थाने सर्वतोपरी लाभदायक ठरते. व्यक्तीला आयुष्यात नूतन उभारी मिळवून देते. सदसद् विवेकबुद्धी, आत्मविश्वास व आत्मशांती मिळते असा मलाही आलेला अनुभव आहे.

या पुस्तकात प्रत्येक शब्दार्थाचे विवेचन आहे त्यामुळे स्तोत्राचा अभ्यास करण्यास सुकर झाले आहे. तसेच पुस्तकाच्या वाचनाची गोडीही वाढते. आपण तन्मयतेने पुस्तक वाचतो हे मी स्वानुभावाने सांगते.

ग्रंथावली : १) गणेश उपासना २) गाणपत्य सांप्रदाय ३) गणपती अथर्वशीर्ष ४) ब्रम्हणस्पतिसूक्त ५) गणेशगीता ६) गणेशसहस्त्रनाम ७) गणेशस्तोत्रे ८) गणेशपूजाविधी ९) संतांचा गणेश १०) गणेशव्रते ११) गणेश अवतारकार्य १२) चतुर्थी माहात्म्य १३) श्रेष्ठतीर्थक्षेत्र मोरगाव १४) भारतातील गणेश स्थाने १५) वेदोक्त पुराणातील गणेश १६) गणेश छंदोपासक १७) योगिंद्रमठ मोरगाव १८) गणेश पुराण १९) मुद्‌गल पुराण २०) प्रसिद्ध अष्टविनायक २१) गणेश आरत्या व करुणाष्टके.

चेक किंवा पे ऑर्डर संपादकाच्या नावाने काढावा. संपर्कासाठी पत्ता :- संपादक : श्री. प्रदीप रामचंद्र रास्ते, प्लॉट ९, 'साकार' बंगला, यशश्री कॉलनी, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२. फोन ०२०- ६५२१११५७. मो. ९८२३७२३१०१.

**सौ. संगीता तुलसीदास फाटक**, पुणे.
फो. २४३७७२८१

## देणगीदारांची यादी

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| विजय दत्तात्रय | पुणे | ५०००/– |
| विक्रम दिनकर | पुणे | ५०००/– |
| अनील श्रीधर | पुणे | ५०००/– |
| रत्नाकर नारायण | कल्याण | ५०००/– |
| भरत बाळकृष्ण | पुणे | ५०००/– |
| प्रदिप रामचंद्र रास्ते | पुणे | ५०००/– |
| विद्याधर कृष्णा | गोरेगाव | ४५००/– |
| दीपक यशवंत<br>अशोक/कौस्तुभ | यु.एस.ए. | ४५००/– |
| नरहर नारायण | मुंबई दादर | ३०००/– |
| सुहास सदाशिव<br>राहुल सुहास | मुंबई | ३०००/– |
| गिरीश जयंत | पुणे | २५००/– |
| गजानन गोविंद, रामेश्वर,<br>ऋषीकेश, यज्ञेश्वर, महेश | पुणे | २५००/– |
| अनिल गजानन | पोरबंदर | २०००/– |
| सुहास सदाशिव | पुणे | २०००/– |
| शरद मोरेश्वर | गोरेगाव | २०००/– |
| भास्कर विठ्ठल | पुणे | २०००/– |
| मुकुंद नारायण | अमरावती | १५००/– |
| प्रविण निळकंठ | अलीबाग | १५००/– |
| वसंत अनंत | औरंगाबाद | १५००/– |
| शिरीष सुरेश<br>सुरेश रामचंद्र | बेळगाव | १५००/– |
| अरुण त्र्यंबक | बडोदा | १५००/– |
| संतोष पांडुरंग | बदलापूर | १५००/– |
| मधुसुदन दत्तात्रय | कल्याण | १५००/– |
| अनिल नरहर | पनवेल | १५००/– |
| मिलींद माधव | कल्याण | १५००/– |
| श्रीकांत रघुनाथ | कल्याण | १५००/– |
| आनंद भालचंद्र | डोंबिवली | १५००/– |
| राजेंद्र भालचंद्र | डोंबिवली | १५००/– |

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| निलकंठ माधव | डोंबिवली | १५००/– |
| जयवंत रघुनाथ | डोंबिवली | १५००/– |
| श्रीकांत रघुनाथ | डोंबिवली | १५००/– |
| गंगाधर रघुनाथ | डोंबिवली | १५००/– |
| कामिनी गजानन पराडकर | डोंबिवली | १५००/– |
| चंद्रकांत भालचंद्र | डोंबिवली | १५००/– |
| गजानन पुरुषोत्तम | डोंबिवली | १५००/– |
| यशवंत रघुनाथ | डोंबिवली | १५००/– |
| प्रभाकर माधव | डोंबिवली | १५००/– |
| रमेश माधव | डोंबिवली | १५००/– |
| दिगंबर माधव | डोंबिवली | १५००/– |
| लक्ष्मण माधव | डोंबिवली | १५००/– |
| अरविंद विनायक | डोंबिवली | १५००/– |
| श्रीराम सदानंद | कर्जत | १५००/– |
| भालचंद्र वामन | डोंबिवली | १५००/– |
| पुरुषोत्तम अनंत | डोंबिवली | १५००/– |
| शांताराम उमाजी | डोंबिवली | १५००/– |
| मुकुंद नारायण | डोंबिवली | १५००/– |
| मुकुंद कृष्णाजी | नाशिक | १५००/– |
| महेश माधव | चिपळूण | १५००/– |
| अक्षय श्रीधर | जालगाव | १५००/– |
| सुखानंद श्रीराम | जालगाव | १५००/– |
| मयुरेश मोरेश्वर | जालगाव | १५००/– |
| प्रसाद जयराम | दापोली | १५००/– |
| अक्षय श्रीधर | दापोली | १५००/– |
| सुखानंद श्रीराम | दापोली | १५००/– |
| मयुरेश मोरेश्वर | दापोली | १५००/– |
| दिगंबर शिवराम | वाई | १५००/– |
| दत्तात्रय अनंत | ठाणे | १५००/– |
| उदय दत्तात्रय | ठाणे | १५००/– |
| सागर प्रकाश | ठाणे | १५००/– |
| पराग विलास | ठाणे | १५००/– |

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| सुनिल रघुनाथ | ठाणे | १५००/- |
| रविंद्र रत्नाकर | डहाणू | १५००/- |
| श्रीनिवास गोविंद | ठाणे | १५००/- |
| डॉ. पांडुरंग भालचंद्र | ठाणे | १५००/- |
| गजानन कृष्णाजी व इतर | धुळे | ६०००/- |
| वसंत दामोदर | नागपूर | १५००/- |
| अविनाश सदाशिव | पार्ले | १५००/- |
| श्रीधर केशव | नागपूर | १५००/- |
| सुधीर कृष्ण | चिंचवड | १५००/- |
| अमित अ. | चिंचवड | १५००/- |
| सुभाष वामन | पुणे | १५००/- |
| राघवेंद्र श्रीधर | पुणे | १५००/- |
| शरद गोपाळ | चिंचवड | १५००/- |
| राजेंद्र चंद्रशेखर | पुणे | १५००/- |
| मधुकर चिंतामण रास्ते | पुणे | १५००/- |
| चंद्रशेखर मा. रास्ते | वाई | १५००/- |
| भास्कर विठ्ठल | पुणे | १५००/- |
| राहुल वि. | पुणे | १५००/- |
| प्रभाकर रघुनाथ | एरंडवणे | १५००/- |
| भालचंद्र दत्तात्रय | पुणे | १५००/- |
| गणेश परशुराम | ठाणे | १५००/- |
| भालचंद्र रघुनाथ | पुणे | १५००/- |
| अनिल विश्वनाथ | पुणे | १५००/- |
| शरद प्रभाकर | पुणे | १५००/- |
| प्रमोद पांडुरंग | नारायणगाव | १५००/- |
| मंदार विश्वास | पौंड रोड | १५००/- |
| दिलीप भास्कर | पुणे | १५००/- |
| शशिकांत विठ्ठल | पुणे | १५००/- |
| प्रमोद पांडुरंग | पुणे | १५००/- |
| जयंत गोविंद | पुणे | १५००/- |
| मोहन बाळकृष्ण | पुणे | १५००/- |
| रघुनाथ कृष्णाजी | पुणे | १५००/- |
| रविंद्र शंकर | पुणे | १५००/- |
| निळकंठ सिताराम | पुणे | १५००/- |

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| मंदार श्रीराम<br>केदार श्रीराम | पुणे | १५००/- |
| किशोर गोपाळ | पुणे | १५००/- |
| प्रसाद सुरेश | पुणे | १५००/- |
| श्रीपाद एकनाथ | पुणे | १५००/- |
| अरुण द. रास्ते | पुणे | १५००/- |
| मोहन रामचंद्र | पुणे | १५००/- |
| अरुण दिगंबर | पुणे | १५००/- |
| श्रीपाद वि. रास्ते | पुणे | १५००/- |
| अविनाश पुरुषोत्तम | पुणे | १५००/- |
| अरुण पुरुषोत्तम | पुणे | १५००/- |
| मुकुंद रामचंद्र | पुणे | १५००/- |
| गोपाळ केशव | पुणे | १५००/- |
| आनंद गोपाळ | पुणे | १५००/- |
| केदार गोपाळ | पुणे | १५००/- |
| अनील कृष्णाजी | पुणे | १५००/- |
| केशव गणेश | पुणे | १५००/- |
| विनायक प्रविण<br>गणेश नारायण<br>प्रविण नारायण | पुणे | ३०००/- |
| अशोक रघुनाथ | पुणे | १५००/- |
| वासुदेव दत्तात्रय | पुणे | १५००/- |
| नंदकुमार गोपाळ | पुणे | १५००/- |
| सच्चिदानंद नंदकुमार | नाशिक | १५००/- |
| समीर नंदकुमार | मुंबई | १५००/- |
| वामन दत्तात्रय | पुणे | १५००/- |
| विश्वनाथ गोपाळ | पुणे | १५००/- |
| अजया आनंद | पुणे | १५००/- |
| प्रमोद अभिजित | पुणे | १५००/- |
| रघुनाथ दिनकर | पुणे | १५००/- |
| अजित त्रिंबक | पुणे | १५००/- |
| मिलिंद मधुकर | पुणे | १५००/- |
| रविराज सखाराम | पुणे | १५००/- |
| मोहन भरत | पुणे | १५००/- |

| नाव | गाव | देणगी ₹ | नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|---|---|---|
| मधुसूदन भास्कर | पुणे | १५००/- | भालचंद्र नीलकंठ | सातारा | १५००/- |
| प्रदीप रा. रास्ते | पुणे | १५००/- | योगेश मनोहर | देवरुख | १५००/- |
| मनोज नारायण | पुणे | १५००/- | शिरिष गोविंद | देवरुख | १५००/- |
| धनंजय रामचंद्र | पुणे | १५००/- | श्रीकांत शशिकांत | चिपळूण | १५००/- |
| प्रशांत प्रभाकर | पुणे | १५००/- | मनोहर दत्तात्रय | चिपळूण | १५००/- |
| आनंद श्रीकृष्ण | बेंगलोर | १५००/- | सुधाकर भास्कर | सांगली | १५००/- |
| नारायण मधुसूदन | इंदूर | १५००/- | प्रशांत यशवंत | यु.एस.ए. | १५००/- |
| श्रीकृष्ण लक्ष्मण | इंदूर | १५००/- | रामकृष्ण गणेश | यु.एस.ए. | १५००/- |
| सुभाष मधुसूदन | इंदूर | १५००/- | अजित अच्युत | पुणे | १५००/- |
| श्रीष अनिल | इंदूर | १५००/- | रुपेश जगदीशचंद्र | राजकोट | १५००/- |
| श्रीपाद विष्णु | इंदूर | १५००/- | अशोक द. रास्ते | पुणे | १५००/- |
| विवेक सुभाष | भोपाळ | १५००/- | चिंतामण भास्कर | इंदूर | १५००/- |
| अनिल प्रभाकर | इंदूर | १५००/- | रामदास नारायण | इंदूर | १५००/- |
| विवेक अनिल | इंदूर | १५००/- | अमित अनिल | पुणे | १५००/- |
| गणेश मोरेश्वर | मुंबई | १५००/- | विश्वास श्रीधर | ठाणे | १५००/- |
| मुकुंद मिलिंद | अंधेरी | १५००/- | विजय शरद | ठाणे | १५००/- |
| नीता चिंतामण | गोरेगाव | १५००/- | सुश्रुत मधुकर | पुणे | १५००/- |
| बळवंत विश्वनाथ | गोरेगाव | १५००/- | श्रीपाद कृष्णा | इंदोर | १५००/- |
| रमेश जनार्दन | सांताक्रुज | १५००/- | श्रीकृष्ण रामचंद्र | दादर | १५००/- |
| राहुल अमरेंद्र सुधाकर | दादर | १५००/- | डॉ. विजय नारायण | इंदूर | १५००/- |
| शशिधर गोपाळ | दादर | १५००/- | धनंजय शामराव | पुणे | १५००/- |
| मधुकर रामेश्वर | मुंबई | १५००/- | विनायक नारायण | मुलुंड | १५००/- |
| विलास केशव | बोरिवली | १५००/- | भालचंद्र गोविंद | मुलुंड | १५००/- |
| हेमंत श्रीधर | बोरिवली | १५००/- | तुकाराम नीळकंठ | ठाणे | १५००/- |
| लक्ष्मण विठ्ठल | बोरिवली | १५००/- | गणेश नारायण | पुणे | १५००/- |
| समीर रमेश | माटुंगा | १५००/- | अनिल श्रीपाद | इंदूर | १५००/- |
| प्रकाश पुरुषोत्तम | पुणे | १५००/- | रमेश दत्तात्रय | निगडी | १५००/- |
| मोहन दामोदर | मुलुंड | १५००/- | निरंजन गंगाधर | बडोदा | १५००/- |
| गणेश रामचंद्र | मुलुंड | १५००/- | हेरंब विश्वनाथ | निगडी | १५००/- |
| भुषण गणेश | | १५००/- | विश्वनाथ दत्तात्रय | पुणे | १५००/- |
| अद्वैत रास्ते | विलेपार्ले | १५००/- | मधुकर शंकर | हिंगणे | १५००/- |
| अनंत दत्तात्रय | विलेपार्ले | १५००/- | गंगाधर रघुनाथ | डोंबिवली | १५००/- |
| यशवंत रामकृष्ण | रत्नागिरी | १५००/- | भरत बाळकृष्ण | पुणे | १५००/- |
| अविनाश धोंडोपंत | रत्नागिरी | १५००/- | शकुंतला बाळकृष्ण | पुणे | १५००/- |

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| नरेंद्र श्रीहरि | पुणे | १५००/- |
| अतुल यशवंत | पुणे | १५००/- |
| अजय जगन्नाथ | डोंबिवली | १५००/- |
| वर्षा विभाकर | अंधेरी | १५००/- |
| मिलिंद गणेश | कोथरुड | १५००/- |
| सरस्वती कृष्णाजी | बोरिवली | १५००/- |
| प्रदीप अच्युत | पुणे | १५००/- |
| कमलाकर लक्ष्मण | इंदूर | १५००/- |
| अमेय सुरेश | डोंबिवली | १५००/- |
| धनंजय शामराव | पुणे | १५००/- |
| अशोक धोंडोपंत | रत्नागिरी | १५००/- |
| यशवंत रघुनाथ | डोंबिवली | १५००/- |
| मिलिंद तुकाराम | ठाणे | १५००/- |
| दत्तात्रय अनंत | ठाणे | १५००/- |
| भालचंद्र गोविंद | प्रभादेवी | १५००/- |
| विनायक नारायण | मुलुंड | १५००/- |
| शांताराम उमाजी | डोंबिवली | १५००/- |
| भालचंद्र दत्तात्रय | पुणे | १५००/- |
| किरण शरद | चिंचवड | १५००/- |
| सदानंद परशुराम | बांबवडे | १५००/- |
| रविंद्र सदानंद | बांबवडे | १५००/- |
| सूर्यकांत सदानंद | बांबवडे | १५००/- |
| चंद्रकांत सदानंद | बांबवडे | १५००/- |
| कै. सुधीर मधुकर | पुणे | १५००/- |
| श्रीकृष्ण रामचंद्र तथा राजा | मुंबई | १५००/- |
| अच्युत गणेश | पुणे | १५००/- |
| मनोहर दत्तात्रय | चिपळूण | १५००/- |
| आनंद गोपाळ | पुणे | १५००/- |
| गोपाळ केशव | पुणे | १५००/- |
| शेखर अनंत | पुणे | १५००/- |
| निखिल रत्नाकर | पुणे | १५००/- |
| सुधीर महादेव | निगडी | १५००/- |
| पांडुरंग नारायण | निगडी | १५००/- |
| पद्माकर लक्ष्मण | बडोदा | १५००/- |

| नाव | गाव | देणगी ₹ |
|---|---|---|
| चंद्रकांत शंकर | वेंगुर्ले | १५००/- |
| नारायण वामन | अमरावती | १५००/- |
| श्रीरंग नारायण | अमरावती | १५००/- |
| मधुसूदन वासुदेव | जामसंडे | १५००/- |
| मुकुंद वासुदेव | जामसंडे | १५००/- |
| उदय शांताराम | हुर्शी | १५००/- |
| संतोष श्रीपाद | पुरळ | १५००/- |
| अविनाश यशवंत | पुणे | १५००/- |
| अक्षय अविनाश | पुणे | १५००/- |
| श्रीराम दामोदर | मुलुंड | १५००/- |
| अंकुश श्रीराम | मुलुंड | १५००/- |
| उषा श्रीकृष्ण | पुणे | १५००/- |
| श्रीकांत बाळकृष्ण | | १५००/- |
| अच्युत गणेश | पुणे | १३५०/- |
| चंद्रकांत रामेश्वर | पुणे | १००१/- |
| विश्वास चिंतामण | पुणे | १०००/- |
| श्रीकृष्ण विष्णू | नागपूर | १०००/- |
| आनंद दत्तात्रय | पुणे | १०००/- |
| मंदाकिनी श्रीराम | मुंबई | १०००/- |
| तुळशीदास गणेश | पुणे | १०००/- |
| विश्वनाथ गणेश | ठाणे | ५०१/- |
| रंजन महादेव | पुणे | ५००/- |
| रविंद्र केशव | पुणे | ५००/- |
| मधुसुदन वासुदेव | पुणे | ५००/- |
| प्रकाश पुरुषोत्तम | पुणे | ५००/- |
| बोधामृत नीलकंठ | रत्नागिरी | ५००/- |
| श्रीराम गोपाळ | दापोली | ५००/- |
| विलास सदाशिव | डोंबिवली | ३००/- |
| सतीश गोविंद | पुणे | ३००/- |
| अजित प्रकाश | पुणे | ३००/- |
| विद्यानंद भालचंद्र | पुणे | ३००/- |
| आदित्य विश्वास | पुणे | ३००/- |
| विनायक रामचंद्र | पुणे | २००/- |